"शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी योजनांचे योगदान : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा"

(इ.स. २०१९-२० ते २०२३-२४)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र शाखेअंतर्गत वाणिज्य विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी करीता सादर केलेला
शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

वडजे गणेश राजाराम

एम.कॉम

नागठाणा (खु.) ता.उमरी जि.नांदेड

मार्गदर्शक

डॉ.आर.बी. रामपुरे

प्राध्यापक तथा एम.कॉम., पीएच.डी.

माधवराव पाटील महाविद्यालय पालम

ता.पालम जि.परभणी

संशोधन केंद्र

पीपल्स महाविद्यालय, नांदेड

डिसेंबर २०२४

१. प्रस्तावना :

भारत देश हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतात ५४.६% लोक हे शेती व्यवसाय करतात.

भारतीय बऱ्याच लोकांचे जीवनमान मोठया प्रमाणात शेतीवर अवलंबुन आहे. कृषी क्षेत्र हे मुक्त व खाजगी क्षेत्र आहे. तसेच ते असंघटीत क्षेत्र आहे. कृषी व्यवसाय हा असा व्यवसाय आहे की ज्यावर आयकर आकारला जात नाही. कृषी व्यवसायाला कर आकारला जात नाही. भारतीय लोकांचे जीवनमान खुप मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबुन असुन त्यात अन्न, वस्त्र, निवारा या गरजा शेतकरी शेतीच्या माध्यमातून भागवतो. भारत देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे मोठे योगदान आहे, कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे.

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्वाचा व्यवसाय आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक आधार म्हणुन शेतीकडे पाहिले जातात. शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रमुख क्षेत्र असुन मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करणारे क्षेत्र आहे.

महात्मा गांधीजींच्या मते, "भारतीय शेती ही भारतीय लोकांच्या उपजिविकेचे साधन असल्यामुळे शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे" असे म्हटले.

भारत देशाला आर्थिक महासत्ता बनविण्यासाठी कृषी क्षेत्राचा जास्तीत जास्त विकास होण्याची आवश्यकता आहे.

भारत देशाचा औद्योगिक आणि सेवा या क्षेत्राचा विकास व्यापक स्वरुपाने विचारात घेतल्यास शेतीवर अवलंबुन आहे.

शेती व्यवसायाची प्रगती होणे आवश्यक असते, शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष करुन चालत नाही. देशाचा आर्थिक विकास साध्य होत नाही.

भारतात शेती व्यवसाय हा प्राचीन काळापासुन चालत आलेला व परंरागत व्यवसाय आहे.

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकास साध्य करण्याचे धोरण स्विकारले. शेतकऱ्यांचा विकास साध्य करण्यासाठी वेगवेगवेगळ्या कल्याणकारी योजना राबवुन शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रयत्न करत आहे.

कृषी क्षेत्राचा इतिहास :

Agar म्हणजेच 'क्षेत्र व प्रदेश' तर Culture म्हणजेच 'मशागत' होय. यातुनच Agriculture म्हणजेच कृषी किंवा शेती या शब्दांची उत्पत्ती झालेली आहे. Agriculture हा मुळ लॅटीन भाषेतील शब्द असुन शेती व शेती संबंधीत विविध क्रियांसाठी तो वापरला जातो.

२. साहित्यिक आढावा :

कृषी विकासाच्या योजना :

कृषी हा राज्य सुचीतील विषय असुन कृषी उत्पादन व उत्पादकता यामध्ये वाढविण्यासाठीची प्राथमिक जबाबदारी राज्य शासनांची आहे. मात्र राज्य शासनाच्या प्रयत्नांना पुरक म्हणुन विविध केंद्रीय व केंद्र पुरस्कृत विविध योजना भारत देशात चालविण्यात येत आहेत.

कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र व राज्य सरकार अनेक प्रयत्न करत आहे.

२.१ राष्ट्रीय कृषी विकास योजना :

ही योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेसाठी २००७-०८ मध्ये सुरुवात करण्यात आली. ऑगस्ट २००७ पासुन तिच्या अंमलबजावणी सुरु झाली.

११ व्या पंचवार्षिक योजने दरम्यान कृषी व संलग्न क्षेत्राच्या वाढीचा दर साध्य करण्यासाठी राज्य सरकारांना कृषीक्षेत्रात सार्वजनिक गुंतवणुक वाढविण्यासाठी प्रात्साहित करणे.

१) अन्न पिकांचा एकात्मिक विकास, विशेषत: भरडधान्ये, गौण तृणधान्य व कडधान्ये. २) कृषी यांत्रिकीकरण ३) मृदा आरोग्य - उत्पादकता ४) जिरायती कृषी व्यवसायाचा विकास ५) एकात्मिक कीड व्यवस्थापन ६) बाजार पायाभुत, संरचना ७) उदयानविद्या, पशु संवधन, दुग्धव्यवसाय व मत्सव्यवसाय ८) सेंद्रीय व जैव खते इत्यादी.

२.२ महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ / महाबीज एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान :

१. मागेल त्याला शेततळे व अस्तरीकरण.

२. सामुहिक शेततळे

३. फळबाग

४. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना

५. कांदाचाळ

६. शेडनेट

७. पॅक हाऊस

८. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका

९. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना

१०. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

११. कृषी यांत्रीकरण योजना

१२. मागेल त्याला सौर कृषी पंप योजना

१३. मुख्यमंत्री कुसुम योजना

१४. प्रधानमंत्री पिक विमा योजना

१५. प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ठिबक सिंचन

१६. सुक्ष्म सिंचन योजना

१७. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना

१८. नमो शेतकरी महासन्मान निधी योजना

३. संशोधनाचे महत्व :

कृषी क्षेत्र हे भारतातील अर्थव्यवस्थेचे महत्वाचे क्षेत्र आहे.

भारतातील एकुण लोकसंख्यापैकी जवळपास ५४.६% लोकसंख्या कृषी संबंधीत क्षेत्रावर कार्यरत असुन देशाच्या GDP मध्ये कृषी क्षेत्राचा २०१३-१४ च्या अहवालानुसार १३.९४% वाटा आहे. भारतातील कृषी क्षेत्रात खुपमोठा प्रमाणात रोजगार निर्माण होतो.

भारतातील शेती ही मोसमी पावसावर अवलंबुन करतात. मोसमी पावसावर शेती अवलंबुन असल्यामुळे कधी पाऊस जास्त तर कधी पाऊस कमी होतो. त्यामुळे शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकटे येतात. अशा अपत्तीमुळे शेतकरी अडचणीत सापडतो. अशा वेळी शासन शेतकऱ्यांना आर्थिक साह्य मदत करते. पुर्वी पारंपारिक शेती शेतकरी करत असत, आता शेतकरी पारंपारिक शेती न करता आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती करु लागला. कारण की शासनांच्या विविध कृषी योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक साह्य होऊ लागले. शेतकरी कृषी योजनांकडे वळुन योजनांच्या माध्यमातून आधिुनिक व तंत्रज्ञानाचाच साह्याने शेतकरी शेती केली तर शेतकरी अडचणीत सापडला जाऊ शकत नाही. आज शेतकरी कृषी योजनांकडे वळल्यामुळे त्याचा शेतकऱ्यांना फायदाही होऊ लागला आहे. तेव्हा कृषी योजनांमुळे शेतकऱ्यांच्या विकासात कशा पध्दतीने वाढ होणार आहे हे शोधण्याच्या प्रयत्न या संशोधनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना कृषी योजना कशा पध्दतीने फायद्याच्या ठरतात व त्यांच्या आर्थिक विकासात वाढ कशा प्रकारे होणार आहेत व शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होणार या संशोधनाच्या माध्यमातून मांडणार आहे.

३.१ संशोधनाचे मर्यादा :

प्रस्तुत संशोधनामध्ये शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी योजनांचे योगदान विशेष संदर्भ नांदेड जिल्हा हा अभ्यास करतांना विशेष संदर्भ नांदेड जिल्हयाचा अभ्यास करण्यात येणार आहे. या संशोधनाद्वारे काढण्यात येणारे निष्कर्ष केवळ नांदेड जिल्हया पुरतेच मर्यादित असुन यामुळे याचे निष्कर्ष इतर कोणत्याही जिल्ळयांना लागु होईल असे म्हणता येणार नाही. केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती घेतली जाणार आहे.

३.२ संशोधनाचे उद्देश :

१. नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. नांदेड जिल्हयातील राबविलेल्या कृषी योजनेच्या स्थितीचा अभ्यास करणे.

३. कृषी योजनांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

४. कृषी योजनांच्या माध्यमातून शासन शेतकऱ्यांना करीत असलेल्या आर्थिक योगदानाचा अभ्यास करणे.

५. कृषी योजना अंमलबजावणीतील अडचणींचा शोध घेवून त्यावर उपाय योजना सुचविणे.

३.३ संशोधनाचे गृहितके :

१. कृषी योजनेमुळे नांदेड जिल्हयातील आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होते.

२. कृषी येजनेचा नांदेड जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही.

३. कृषी योजना नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाहीत.

४. शासन स्तरावर कृषी योजनाच्या अंमलबजावणीमध्ये समस्या आहेत.

५. कृषी योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जागृता नाही.

३.४ प्राथमिक तथ्य :

प्राथमिक तथ्यात शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी योजनांचे योगदान अभ्यासासाठी प्रामुख्याने प्राथमिक तथ्य मिळवण्यासाठी शेतकऱ्यांकडून प्रत्य़क्ष प्रश्नावली व मुलाखती घेण्यात येईल व त्याचप्रमाणे या साधनांचा तथ्य संकलन करण्यासाठी उपयोग करण्यात येईल.

३.५ दुय्यम तथ्य :

कृषी संबंधीत अभ्यास करण्यासाठी भारतीय कृषी विभागाने प्रसिद्ध केलेले अहवाल, महाराष्ट्र राज्य कृषी विभागाने प्रसिद्ध केलेले अहवाल, पंचवार्षिक योजनांचे अंदाज पत्रके, कृषी विभागाच्या विविध माहिती पुस्तिका, कृषी मासिके, वर्तमान पत्रे, इंटरनेट, विविध लेख, पुस्तके, सांख्यिकी माहिती, संदर्भ ग्रंथ इत्यादी या साधनांचा पुरेपुर वापर करण्यात येईल.

३.६ नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनामध्ये शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी योजनांचे योगदान : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा या विषयाचा अभ्यास करण्यासाठी सहेतुक पद्धतीने नांदेड जिल्ह्याचीच या संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यात एकुण १६ तालुका आहेत, त्या १६ तालुक्यापैकी सर्व तालुक्यांची निवड करण्यात येईल, त्या प्रत्येक तालुक्यातून २० शेतकरी या प्रमाणे एकुण ३२० शेतक-यांची निवड करण्यात येईल.

३.७ अभ्यासाचा कालावधी :

शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी योजनांचे योगदान विशेष संदर्भ नांदेड जिल्हा या विषयाचा अभ्यास करण्यासाठी सन २०१९-२०, २०२३-२४ हा कालावधी निवड करण्यात आला आहे.

या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील किती शेतकऱ्यांना कृषी योजनांचा लाभ झाला आहे, या कृषी योजनामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक विकासामध्ये वाढ झाली आहे का? हा शोध या संशोधनाच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे.

आकडेवारी :

आकडेवारी विश्लेषण करण्यासाठी सरासरी, वृध्दीदर मीन मिडयन मोड, प्रमाण विचलन या सांख्यीकीय साधनांचा वापर करण्यात येईल.

**४.	नांदेड जिल्हयाचा सामाजिक आणि आर्थिक अभ्यास :**

या प्रकरणामध्ये नांदेड जिल्हयाची भौगोलिक माहिती ऐतिहासीक माहिती रचना, जमीन, हवामान, औद्योगिकरण, रोजगार, शिक्षण, लोकसंख्या, सिंचन, कृषी घटकाबद्दल अभ्यास करण्यात येईल.

**५.	कृषी योजनांचे नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासातील आढावा :**

नांदेड जिल्हयात विविध कृषी योजना राबविल्या जात आहेत, जसे की पिक लागवड, फळबाग लागवड, जलसिंचन अन्य विविध योजना, शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य मदत आणि अनुदान देण्याचा योजना यांचा सविस्तर आढावा प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

**६.	तथ्यांचे विश्लेषण :**

प्रामुख्याने नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी योजनांचे योगदान असणाऱ्या ज्या शेतकऱ्यांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात येईलव प्रत्यक्ष मुलाखत घेऊन व शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी योजनांचे योगदानाबद्दल विश्लेषण करण्यात येईल.

**७.	निष्कर्ष व शिफारशी :**

प्रामुख्याने या प्रकरणामध्ये संपुर्ण संशोधन अहवालाचा सखोल अभ्यास करुन निष्कर्ष काढण्यात येइल व त्या प्रमाणे या निष्कर्षावरुनच योग्य प्रमाणे शिफारशी करण्यात येतील.

प्रकरणाची मांडणी :

प्रकरण पहिले : प्रस्तावना

भारतीय कृषी क्षेत्रा विषयी माहिती, महाराष्ट्र विषयी कृषी क्षेत्र विषयी माहिती, कृषी क्षेत्राचा इतिहास याचा शोध घेण्याचा हा प्रबंध आहे.

प्रकरण दुसरे : साहित्यिक आढावा

या प्रकरणामध्ये विविध कृषी योजनांच्या प्रकरणांचा आढावा घेण्यात येईल. जसे की, राष्ट्रीय कृषी विकास योजना, कृषी विभाग प्रसिध्द केलेले अहवाल, कृषी विभाग माहिती पुस्तीका, मासिके, लेख, वृत्तमान पत्रे, इंटरनेट इत्यादी.

प्रकरण तिसरे : संशोधन पद्धती

या प्रकरणात संशोधन विषयाचे महत्व, मर्यादा, संशोधनाचे उद्देश, संशोधनाचे गृहितके, संशोधनाच्या पध्दती, प्रकरण रचना इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण चौथ : नांदेड जिल्हयाच्या सामाजिक आणि आर्थिक अभ्यास

या प्रकरणामध्ये नांदेड जिल्हयाची भौगोलिक माहिती, ऐतिहासिक माहिती, रचना जमीन, हवामान, औद्योगिकरण, रोजगार, शिक्षण, लोकसंख्या, सिंचन, कृषी घटकाबद्दल अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : कृषी योजनांचे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासातील आढावा

या प्रकरणामध्ये नांदेड जिल्ह्यातील राबविण्यात आलेल्या विविध कृषी योजनाचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण सहावे : तथ्यांचे विश्लेषण

प्रामुख्याने नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी योजनांचे योगदान असणाऱ्या ज्या शेतकऱ्याकडून प्रश्नावली भरुन घेण्यात येईल.

प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारशी

प्रामुख्याने या प्रकरणामध्ये संपुर्ण संशोधन अहवालाचा सखोल अभ्यास करुन निष्कर्ष काढण्यात येईल व त्या प्रमाणे या निष्कर्षावरुनच योग्य प्रमाणे शिफारशी करण्यात येतील.

संदर्भसुची :

१. डॉ.राहुल शं. म्होपरे, डॉ.संजय शं. रुपे, भारतातील कृषी विकास, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

२. प्रा.डॉ.दत्तात्रय भुतेकर, कृषी अर्थशास्त्र.

३. रंजन कोळंबे, कृषीशास्त्र आणि कृषी विकास, भगीरथ प्रकाशन.

४. स्वप्नील भंडारे, पुष्पलता कृषी घटक, विश्वकर्मा पब्लिकेशन.

५. रंजन कोळंबे, भारतीय अर्थ व्यवस्था, भगीरथ प्रकाशन.

६. कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती पुस्तिका.

७. मासिके कृषी विभाग

८. विवेक सौताडेकर, आपला नांदेड जिल्हा, विद्या भारतीय प्रकाशन

९. वेबसाईट :
  १. भारतीय कृषी विभाग.
  २. महाराष्ट्र कृषि विभाग
  ३. ऍग्रीक्लचर.
  ४. MAHA.DBT.

संशोधक
वडजे गणेश राजाराम
एम.कॉम
नागठाणा (खु.) ता.उमरी जि.नांदेड

मार्गदर्शक
डॉ.आर.बी. रामपुरे
प्राध्यापक तथा एम.कॉम., पीएच.डी.
माधवराव पाटील महाविद्यालय पालम
ता.पालम जि.परभणी